# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**सोलापूर शहरातील कोंडी देगांव या रस्त्याच्या दुरावस्थेबाबत**

**(१) ४१७४ (२३-१२-२०१४). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील जडवाहतूक शहराबाहेरुन वळविण्याकरिता पूर्वीपासून असणाऱ्या कोंडी देगांव रस्त्याच्या मजबुतीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत असून या रस्त्याची अतिशय दयनीय अवस्था झाली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्याच्या मजबुतीकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०३-२०१५) :**(१), (२) व (३) प्रश्नाधीन रस्ता हा कोंडी देगाव नसून केगांव ते देगाव राज्य मार्ग क्र. २०५ असा असून त्याची लांबी ६.०० कि.मी. आहे. या लांबीपैकी पावसाळयात क्षतिग्रस्त झालेल्या १.१०० कि.मी. लांबीतील खड्डे भरुन वाहतूक सुरळीत ठेवण्यात आली आहे. सदर रस्त्याच्या आवश्यक लांबीतील मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम निधी, निकष व प्राथम्यक्रमाने हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**पोलादपूर (जि.रायगड) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात कायमस्वरुपी वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत**

**(२) १७५८३ (१४-०८-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.काशिराम पावरा**

**(शिरपूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलादपूर (जि.रायगड) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात कायमस्वरुपी वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती केली नसल्याने महाड येथील आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त कार्यभार दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील रुग्णालयात अपुरा अधिकारी व कर्मचारी वर्ग असल्यामुळे रुग्ण आणि अपघातग्रस्तांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात कायमस्वरुपी वैद्यकीय अधिकारी नियुक्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१०-०२-२०१७) :**(१) व (२) ग्रामीण रुग्णालय, पोलादपूर, जि.रायगड येथील वैद्यकीय अधिक्षकाचा अतिरिक्त कार्यभार ग्रामीण रुग्णालय महाड वैद्यकीय अधीक्षकांना देण्यात आला होता. तथापी, सद्यस्थितीमध्ये ग्रामीण रुग्णालय, पोलादपूर, जि.रायगड येथील वैद्यकीय अधीक्षकाचे पद भरण्यात आलेले आहे.

ग्रामीण रुग्णालय, पोलादपूर येथे वर्ग-१ ते वर्ग-४ ची एकूण २५ पदे मंजूर असून त्यापैकी १८ पदे भरलेली आहेत. यामध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मंजूर ३ पदांपैकी १ पद रिक्त असून अन्य दोन पदांवर एक स्थायी व एक बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. उपलब्ध असलेल्या अधिकारी व कर्मचारी वर्गाकडून रुग्णांना आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहे.

(३) वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त असलेली पदे भरण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चाकुर (जि.लातुर) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात अनुभवी व तज्ञ डॉक्टर्स मागील २ वर्षापासून नेमण्यात आले नसल्याबाबत**

**(३) ३४८४८ (२१-०१-२०१६). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकुर तालुक्यातील (जि.लातुर) ग्रामीण रुग्णालयात अनुभवी व तज्ञ डॉक्टर्स मागील २ वर्षापासून नेमण्यात आलेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयासाठी ट्रामा सेंटर मंजूर होवूनही अद्यापपर्यंत सुरु करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रुग्णालयात योग्य डॉक्टर्स व ट्रॉमा केअरची सोय नसल्याचे गरीब रुग्णांना आरोग्य सेवेपासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने यासंदर्भात काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१०-०२-२०१७)** :(१) हे खरे नाही.

ग्रामीण रुग्णालय, चाकुर, जि.लातूर येथे वैद्यकीय अधिकारी संवर्गाची मंजूर असलेली ३ ही पदे स्त्री रोग तज्ञ, बालरोग तज्ञ व भिषक या विशेषज्ञांसह भरलेली आहेत.

(२) होय.

आरोग्य संस्था स्थापनेच्या बृहत आराखड्यामध्ये ग्रामीण रुग्णालय, चाकूर येथे ट्रामा केअर युनिट स्थापनेस मान्यता दिलेली असून सदरच्या इमारत बांधकामाच्या अंदाज व आराखड्यासही प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. इमारतीचे बांधकाम ७५ टक्के पुर्ण झाल्यावर पदनिर्मिती करुन तद्नंतर पदभरती करण्यात येईल व ट्रामा केअर युनिट पुर्णपणे कार्यान्वित होईल.

(३) सद्य:स्थितीत ग्रामीण रुग्णालय, चाकूर व ग्रामीण रुग्णालय, अहमदनगर येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मार्फत रुग्णांना आरोग्य सेवा देण्यात येत आहे. त्यामुळे गरीबरुग्ण आरोग्य सेवेपासून वंचित राहिलेले नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालयात कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणेबाबत

**(४) ३८४९८ (२१-०१-२०१६). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालयात अनेक वैद्यकीय तज्ञांची व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असून त्यामुळे गोरगरीब रुग्णांना वैद्यकीय सेवा पुरेशा प्रमाणात मिळत नसल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात ४ वैद्यकीय अधिकारी, २ सफाई कामगार, २ परिचारिका व नेत्ररोग तज्ञ पदे तात्काळ भरणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णालयात एकच रुग्णवाहिका असून ती नादुरुस्त असून त्यासोबत आणखी १ अतिरिक्त रुग्णवाहिका आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी याबाबत आरोग्य प्रशासनाकडे वेळोवेळी सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१०-०२-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

उप जिल्हा रुग्णालय, मलकापूर, जि.बुलढाणा येथे वर्ग-१ ते वर्ग-४ संवर्गाची एकूण ४८ पदे मंजूर असून त्यौकी ३६ पदे भरलेली आहेत. यामध्ये स्त्री रोग तज्ञ या बाल रोग तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांचा समावेश आहे. तसेच कंत्राटी तत्वावर १ शल्यचिकित्सक व १ बालरोग तज्ञ कार्यरत असून शालेय आरोग्य तपासणी कार्यक्रमांतर्गत ३ व आयुषचे २ वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. या सर्व उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत गोरगरीब रुग्णांना नियमितपणे वैद्यकीय सेवा देण्यात येते.

(२) अंशत: खरे आहे.

वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे स्वतंत्र निवड मंडळामार्फत मुलाखतीद्वारे नामनिर्देशनाने पात्र ठरलेल्या उमेदवारांचे समुपदेशन घेऊन भरण्याबाबत कार्यवाही चालू आहे.

सफाईगारांची मंजूर असलेली दोनही पदे भरलेली आहेत.

अधिपरिचारीकांची १२ पदे मंजूर असून त्यापैकी ११ पदे भरलेली आहेत.

उप जिल्हा रुग्णालय, मलकापूर येथे आकृतीबंधानुसार नेत्ररोग तज्ञाचे पद मंजूर नाही.

(३) हे खरे नाही.

उप जिल्हा रुग्णालय, मलकापूर येथे दोन रुग्णवाहिका कार्यरत आहेत. त्यापैकी एक रुग्णवाहिका दुरुस्तीसाठी देण्यात आली होती व सद्य:स्थितीत ती दुरुस्त होऊन कार्यरत आहे.

(४) होय.

(५) वर्ग-१ ची रिक्त पदे पदोन्नती व नामनिर्देशनाने भरणे, गट-अ ची विशेषज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे मुलाखतीद्वारे भरणेबाबतची कार्यवाही शासन स्तरावर चालू आहे. वर्ग ३ व वर्ग-४ ची भरण्याबाबतची कार्यवाही उप संचालक स्तरावर चालू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### गौडगाव (ता.बार्शी, जि.सोलापूर) येथील तलावासाठी भूसंपादन करण्यात आलेल्या जमिनीचा मोबदला बाधित शेतकऱ्यांना मिळण्याबाबत

**(५) ४२४६६ (२१-०४-२०१६). श्री.सिध्दराम म्हेत्रे (अक्कलकोट), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गौडगाव (ता.बार्शी, जि.सोलापूर) येथील शेतकऱ्यांने सन १९७२ मध्ये तलावासाठी भूसंपादन करण्यात आलेल्या जमिनीच्या मोबदल्यापोटी दाखल केलेल्या दाव्यात न्यायालयाने आदेश देऊन १० वर्षे हेलपाटा मारुनही मोबदला न मिळाल्यामुळे संतप्त शेतकऱ्यांने न्यायालयाच्या आदेशानुसार येथील लघु पाटबंधारे विभागांतर्गत येणाऱ्या लघु पाटबंधारे विभाग क्र. १ येथील कार्यालयातील खुर्च्या, फर्निचर असे साहित्य जप्त केले असल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूसंपादीत केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०८-०३-२०१७) :**(१) होय.
(२) याबाबत तात्काळ उपाययोजना करण्याचे निदेश जिल्हाधिकारी सोलापूर यांना देण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील संदर्भ सेवा रुग्णालयातील नर्स व कार्यालयीन कर्मचाऱ्यांकडून रुग्णाची पिळवणूक होत असल्याबाबत**

**(६) ४७३८० (११-०५-२०१६). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील संदर्भ सेवा रुग्णालयातील नर्स व कार्यालयीन कर्मचाऱ्यांकडून रुग्णाची पिळवणूक होत असल्याची तकार मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे माहे नोव्हेबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तकारीची दखल घेऊन शासनाने याबाबत काही कार्यवाही केली आहे काय,
(३) नसल्याची, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०६-०२-२०१७) :**(१) होय हे खरे आहे.
(२) वैद्यकीय अधिक्षक, विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, नाशिक यांनी तक्रारीच्या अनुषंगाने सर्व नर्सिंग स्टाफ व कर्मचारी यांना दालनात बोलावून संघटनेच्या कार्यकर्त्यांसमोर स्पष्टीकरण विचारले व भविष्यात असे होणार नाही याबाबत समज दिली.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील जे. जे. रुग्णालयाच्या तज्ञ डॉक्टरांच्या समितीकडे डॉक्टरांच्या हलगर्जीपणा विरोधातील तक्रारीची प्रलंबित असलेली प्रकरणे**

**(७) ५१५२५ (०३-०५-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील जे.जे.रुग्णालयाच्या तज्ञ डॉक्टरांच्या समितीकडे सन २०११ ते २०१५ या कालावधीत डॉक्टरांच्या हलगर्जीपणा विरोधातील तक्रारीची सुमारे ६२ टक्के प्रकरणे प्रलंबित असल्याची गंभीर बाब माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले, तद्नुसार संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) तसेच डॉक्टरांचा हलगर्जीपणा रोखण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२५-०१-२०१७) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे.

परंतु डॉक्टरांच्या हलगर्जीपणा विरोधातील तक्रारींची ६२ टक्के प्रकरणे प्रलंबित नसून, ती २१.६७ टक्के इतकी आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) वैद्यकीय उपचारा दरम्यान होणाऱ्या हलगर्जीपणाच्या संदर्भात करावयाच्या उपाययोजनांकरिता शासन निर्णय क्र.ळब्युपीएम-२०१३/प्र.क्र.२८९/प्र.शा-२, दि.३१ जानेवारी, २०१४ अन्वये वैद्यकीय मंडळाचे विभाग निश्चित करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी नसताना पॅथलॉजी तपासण्यांचे अहवाल प्रमाणित करणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करण्याबाबत**

**(८) ५४०७८ (२२-०८-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.सुभाष साबणे (देगलूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी नसताना पॅथॉलॉजी तपासण्यांचे अहवाल प्रमाणित करणे तसेच नोंदणीकृत वैद्यक व्यवसायकाने कोरी लेटर हेड, सही करुन अशा पॅथॉलॉजीला देऊन सदर बनावट पॅथालॉजीने त्यावर रुग्णांचे तपासण्याचे अहवाल टंकलिखित करणे, यासंदर्भात गत सत्रात मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री यांनी दिनांक १३ एप्रिल, २०१६ रोजी केलेल्या निवेदनाचे अनुषंगाने दिनांक २४ मे, २०१६ रोजी काढलेला शासन निर्णय दिनांक २६ मे, २०१६ रोजी तहकूब करण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) तसेच, थायरॉइडच्या चाचण्या करण्यात आघाडीवर असलेल्या एका प्रख्यात डायग्नोस्टिक सेंटरनी डॉक्टरांना कोणत्या रोगाचे निदान करण्यासाठी किती रुपये कमिशन देण्यात येईल याबाबतचे दरपत्रकच पाठविण्यात आल्याची तक्रार पुराव्यानिशी महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान करण्यात आली असून उक्त

दरपत्रकामध्ये ११ चाचण्यांचा समावेश असून डॉक्टरांना प्रत्येक रुग्णामागे १५० ते ३०० रुपये कमिशन दिले जाईल असा स्पष्ट उल्लेख करण्यात आला असून, रुग्णाला कोणता दर सांगावयाचा, डॉक्टराना किती कमिशन मिळणार याचेही आकडे दरपत्रकात नमूद करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डायग्नोस्टिक सेंटरमध्ये पॅथलॉजिस्टची नियुक्ती व प्रत्येक अहवालावर पॅथलॉजिस्ट सही करणे बंधनकारक असताना अशाप्रकारच्या अनेक बनावट डायग्नोस्टिक सेंटरमध्ये कोऱ्या लेटर हेडवर अगोदरच सह्या घेऊन नंतर त्यावर टेकनिशन्स अहवालाची प्रिंट काढून रोग निदान अहवाल रुग्णास दिला जातो, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार बनावट पॅथलॉजिस्ट चालविणाऱ्या संबंधितांवर तसेच नोंदणीकृत पॅथलॉजिस्ट आपली कोरी लेटरहेड अशा बनावट पॅथलॉजिस्टना देऊन रोगाचे निदान करण्यास हातभार लावणाऱ्याविरुध्द कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०२-२०१७)** :(१) होय, नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी नसतांना विकृतिचिकित्सा तपासण्याचे अहवाल प्रमाणित करणाऱ्या व्यक्तींवर महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ च्या कलम ३३ नुसार कारवाई करण्यासाठी क्र. एमएमपी-०५१६/ प्र.क्र.२१/ अधिनियम, दि..२४.०५.२०१६ रोजी शासन परिपत्रक काढण्यात आले. तद्नंतर सदर शासन परिपत्रक हे शासन निर्णय क्र. एमएमपी-०५१६/प्र.क्र.२३/अधिनियम, दिनांक २६ मे, २०१६ अन्वये तहकुब करण्यात आले.

त्यानंतर शासन निर्णय क्र. एमएमपी-०५१६/प्र.क्र.२३/अधिनियम, दि.२६ मे, २०१६ अन्वये डी.एम.एल.टी. किंवा तत्सम अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तींना राज्यातील विनिर्दिष्ट क्षेत्रांमध्ये विनिदिष्ट विकृतिचिकित्सा तपासण्या करण्याचे अधिकार प्रदान करण्याच्या दृष्टीने तज्ञांची समिती गठित करण्यात आली.

(२) होय हे खरे आहे.

डॉ.जयेश लेले यांनी थायरोकेअर डायग्नोस्टिक सेंटरचे दरपत्रक महाराष्ट्र वैद्यक परिषदेचे माजी सदस्य डॉ.सुहास पिंगळे यांनी ई-मेल द्वारे दि.३०. मे, २०१६ रोजी पाठविले होते. प्राप्त झालेल्या दरपत्रकामध्ये ११ चाचण्यांचा समावेश असून डॉक्टरांना प्रत्येक रुग्णामागे १५० ते ३०० रुपये कमिशन मिळणार याचे आकडे दरपत्रकात नमूद केले आहेत.

(३) महाराष्ट्र वैद्यक परिषदेकडे काही पॅथॉलॉजिस्ट अनेक पॅथॉलॉजी लॅबमध्ये न जाता वैद्यकीय चाचण्या रिपोर्टवर स्वाक्षरी करण्यात असल्याबाबत, तसेच एकच पॅथॉलॉजीस्ट एकाच दिवशी विविध पॅथॉलॉजी लॅबमध्ये जात असल्याबाबतच्या ५ पॅथॉलॉजीस्ट विरुध्द तक्रारी या महाराष्ट्र वैद्यक परिषदेस सन २०११ मध्ये महाराष्ट्र असोसिएशन ऑफ प्रॅक्टीसिंग पॅथॉलॉजीस्ट ॲन्ड मायक्रोबायोलॉजिस्ट या संघटनेकडून प्राप्त झाल्या होत्या.

(४) महाराष्ट्र वैद्यक परिषदेने उपरोक्त पॅथॉलॉजीस्टची रितसर सुनावणी केली आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने अधिनियम १९६५ मधील कलम २२ नुसार एकूण ५ पॅथॉलॉजीस्टपैकी ४ पॅथॉलॉजीस्टवर कार्यवाही करुन त्यांना शिक्षा केली आहे व त्यातील एका पॅथॉलॉजीस्टची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील डॉक्टरांवरील ताण कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याबाबत**

**(९) ५४६७८ (२२-०८-२०१६). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील डॉक्टरांवरील ताण कमी करण्यासाठी परिचारिकांना जबाबदारी देण्याची तसेच आवश्यक त्या उपाययोजना करण्याकरिता निवासी डॉक्टरांच्या संघटनेने मा.वैद्यकीय शिक्षणमंत्री यांचेकडे दिनांक ९ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी निवासी डॉक्टरांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे, तसेच निवासी डॉक्टरांवर दिवसेंदिवस वाढणारा ताण कमी करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०१-२०१७) :**(१) राज्यातील निवासी डॉक्टरांच्या सेंट्रल मार्ड या संघटनेमार्फत अशा प्रकारची मागणी केली असल्याचे आढळून येत नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही. तथापि, निवासी डॉक्टरांच्या कामाच्या तासिकावर नियंत्रण आणण्यासाठी प्रत्येक महाविद्यालयात कॉलेज कौन्सिलची बैठक घेण्यात येऊन त्या-त्या विभागाच्या विभाग प्रमुखांमार्फत निवासी डॉक्टरांच्या दैनंदिन कामाचे नियोजन ठरविण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील दोन रुग्णालयांचे राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंच्या समितीने निलंबन केल्याबाबत**

**(१०) ५८७०९ (३०-०८-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील दोन रुग्णालयांचे मुंबई येथील राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंच्या समितीने माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निलंबन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही दोन रुग्णालये कोणती, व त्यांचेवर निलंबन करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०९-०१-२०१७) :**(१) होय.

(२) कोल्हापूर जिल्हयातील निरामय हॉस्पीटल या रुग्णालयात, अधिक पॅकेज दर असलेल्या विशेषज्ञ सेवेचा दुरुपयोग केल्यामुळे व वैद्यकीय कागदपत्रांमध्ये फेरफार केल्यामुळे निलंबित करण्यात आले आहे.

तसेच रामकृष्ण जैस्वाल या रुग्णालयास, योजनेंतर्गत अंगीकृत नसलेल्या रुग्णालयात रुग्णास उपचार देण्यात आल्याने निलंबित करण्यात आले आहे.

(३) दि. ११ ऑगस्ट, २०१६ रोजी झालेल्या ६८ व्या रुग्णालय अंगीकरण समितीच्या बैठकीमध्ये वरील दोन्ही रुग्णालयांबाबत प्राप्त तक्रारी व वैद्यकीय परिक्षण अहवालाच्या अनुषंगाने पुन्हा चर्चा करण्यात आली त्यानुसार निरामय हॉस्पीटल, कोल्हापूर या रुग्णालयाचे निलंबन कायम ठेवून रामकृष्ण जैस्वाल हॉस्पीटल, कोल्हापूर या रुग्णालयाचे अंगीकरण रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला.

---

## राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागातील औषध घोटाळ्या प्रकरणी सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समिती नेमण्यात आल्याबाबत

**(११) ५८८११ (३०-०८-२०१६). श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागातील औषध घोटाळ्या प्रकरणी सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समिती नेमण्यात आल्याची घोषणा मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य यांनी माहे मार्च २०१६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये केली होती, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर समितीला एक महिन्यात अहवाल सादर करण्याची मुदत देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशी कोणत्या व त्यानुसार काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०६-०२-२०१७) :**(१) होय.

(२) सदर समितीने आपला अहवाल दोन आठवड्यात शासनास सादर करावा, असे निर्देश देण्यात आले होते.

(३) प्राथमिक चौकशी अहवालाप्रमाणे “औषधांच्या खरेदीची पुर्णवेळ चौकशी अधिकारी नेमून या प्रकरणाची सखोल चौकशी करुन संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे.” अशी शिफारस करण्यात आली होती.

त्यानुसार सदर औषध खरेदी सखोल चौकशी करण्यासाठी सेवानिवृत्त अपर मुख्य सचिव यांची एक सदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली होती. सदर समितीने दिनांक १९.८.२०१६ रोजी सखोल चौकशी अहवाल सादर केला असून सदर चौकशी अहवाल शासनाने स्वीकारला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाच्या नियमानुसार जन्म-मृत्यूची नोंदणी २१ दिवसांच्या आत करणे बंधनकारक असण्याबाबत**

**(१२) ५९७७२ (२२-०८-२०१६). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या नियमानुसार जन्म-मृत्यूची नोंदणी २१ दिवसांच्या आत करणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमार्फत जन्म-मृत्यूचे अभिलेख मनपाला वेळेत प्राप्त होत नसल्याने विहित कालावधीत नोंदणी करणे शक्य होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे नोंदणी करण्यास नागरिकांना अडचण येत असून आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०२-२०१७) :**(१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील क्षयरोग रुग्णाची संख्येमध्ये वाढ झाल्याबाबत**

**(१३) ६०७६९ (३०-०८-२०१६). श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील क्षयरोगाच्या रुग्णाच्या संख्येत दरवर्षी वाढ होत असल्याचे दिसून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१५-१६ या वर्षात सुमारे ५ लाखावर पोहचली आहे व एमडीआर व एक्सडीआर रुग्णाच्या संख्येतही मोठी वाढ झाली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य शासन क्षय रोगावरील उपचारासाठी तसेच या रोगाच्या प्रसार रोखण्यासाठी करीत असलेल्या उपाययोजना फेर आढावा घेवून या रोगाचा प्रतिबंध करण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे काय
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०६-०१-२०१७) :**(१) हे खरे नाही.

राज्यात सन २०१२ मध्ये १,३६,०४५ क्षयरुग्ण, सन २०१३ मध्ये १,३७,३२० क्षयरुग्ण, सन २०१४ मध्ये १,३५,४६५, सन २०१५ मध्ये १,३०,९१० क्षयरुग्ण तसेच सन २०१६ मध्ये (माहे जुलै अखेर) ७५,०६१ क्षयरुग्ण आढळून आले आहेत.

वरील आकडेवारी पाहता क्षयरुग्णांची संख्या दरवर्षी कमी होत असल्याचे आढळून येत आहे.

(२) हे खरे आहे.

राज्यात आढळून आलेल्या एमडीआर व एक्सडीआर रुग्णांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झालेल्या आढळून आले नाही.

(३) राज्यात सर्व जिल्ह्यातील व महानगरपालिकांमध्ये सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येतो. राज्यात दरवर्षी साधारणपणे १,३७,००० पर्यंत क्षयरुग्ण आढळून येतात. निरोगी व्यक्ती फुप्फुसाच्या क्षयरुग्णांच्या संपर्कात आल्यास त्या व्यक्तीस क्षयरोग होऊ शकतो तसेच या रोगाचा प्रसार दूषित हवेमार्फत होतो. या रोगावर नियंत्रण करण्याकरिता राज्य शासनाने खालील उपाययोजना केल्या आहेत.

१. संशयित क्षयरुग्णांचा थुंकी नमुना तपासणीसाठी सूक्ष्मदर्शीकेंद्रे स्थापन. ३६,९२५ हॉट प्रोव्हायडर्स कार्यरत राज्यात कल्चर ॲण्ड डी.एस.टी. प्रयोगशाळा केंद्र शासनाने मंजूर केल्या आहेत. ७४ CBNNAT यंत्रे उपलब्ध १६ डॉट्स प्लस वार्ड उपलब्ध आहेत. ३३ जिल्हा क्षयरोग केंद्रे व ४६ शहर क्षयरोग केंद्रे स्थापन.

२. राज्यात करारतत्वावर एकूण २१९३ अधिकारी व कर्मचारी वर्ग मंजूर.

३. सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाने मागील वर्षी (२०१५-१६) रुपये ८१.८७ कोटी निधी मंजूर केलेला आहे. तसेच चालू वर्षी (२०१६-१७) रुपये ७७.७२ कोटी निधी पी.आय.पी. मध्ये उपलब्ध केलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत सांगली व कोल्हापूरातील अनेक रुग्णांलयाकडून रुग्णांकडून जास्त रक्कम वसूल केल्याबाबत

**(१४) ६१५५४ (३०-०८-२०१६). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत सांगली व कोल्हापूरातील अनेक रुग्णालयाकडून रुग्णाकडून जास्त रक्कम वसूल करण्यात येत आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, रुग्णांना उपचारादरम्यान आवश्यक त्या सर्व चाचण्या बाहेरुन करण्यास सांगितल्या जातात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रुग्णालयांची चौकशी करण्यात येणार काय,

(४) असल्यास, चौकशीअंती दोषी आढळल्यास त्यांच्यावरती कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०९-०१-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत नोव्हेंबर, २०१३ ते सप्टेंबर, २०१६ या कालावधीत सांगली जिल्ह्यामध्ये २९३ तक्रारी या वैद्यकीय निदान, औषधोपचार व इतर चाचण्यांसाठी रुग्णांनी स्वत:खर्च केल्याबाबतच्या आहेत. तसेच या कालावधीत याच कारणांकरिता कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ३२४ तक्रारी नोंदविण्यात आल्या आहेत.

(२) नाही.

(३) रुग्णाची योजनेंतर्गत नोंद झाल्यानंतर उपचारादरम्यानच्या तपासण्या व चाचण्या मोफत केल्या जातात. तथापि अशा तक्रारी प्राप्त झाल्यास अथवा निदर्शनास आल्यास, त्या रुग्णालयाविरुध्द चौकशी करुन रुग्णास झालेला खर्च संबंधित रुग्णालयाकडून परत केला जातो. अशा प्रकारे सांगली जिल्ह्यातील २९३ तक्रारीपैकी २१२ तक्रारींचे तर कोल्हापूर जिल्ह्यातील ३२४ तक्रारींपैकी ३१० तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहे उर्वरित तक्रारींचे निराकरण करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(४) योजनेंतर्गत आतापर्यंत रुग्णांकडून अतिरिक्त पैसे घेतल्याच्या तक्रारींच्या पार्श्वभुमीवर सांगली जिल्ह्यामधील १ रुग्णालयाची मान्यता रद्द करण्यात आली आहे. ३ रुग्णालयांचे निलंबन करण्यात आले होते. परंतु तक्रारींचे निवारण केल्यामुळे त्यांचे निलंबन रद्द करण्यात आले आहे. तसेच ६ रुग्णालयांना कारणेदाखवा नोटीस पाठविण्यात आल्या आहेत.

कोल्हापूर जिल्ह्यामधील २ रुग्णालयांची मान्यता रद्द करण्यात आली आहे, १ रुग्णालयाचे निलंबन करण्यात आले असून ५ रुग्णालयांना कारणे दाखवा नोटीस पाठविण्यात आली आहे.

---

## रायगड जिल्हा रूग्णालयात रूग्णांना अपंगत्वाचा दाखला मिळण्यास अनेक अडचणी निर्माण होत असल्याबाबत

**(१५) ६१८३४ (३०-०८-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हा रूग्णालयात डॉक्टर उपस्थित नसल्यामुळे रूग्णांना अपंगत्वाचा दाखला मिळण्यास अनेक अडचणी निर्माण होत असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, नेत्र तपासणी, अंध, बहीरे, मुके, पोलीयोग्रस्त रूग्णांना शासकीय योजनांसाठी आवश्यक असणारा अपंगत्वाचा दाखला वेळीच न मिळल्यामुळे योजनांचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून अपंग रूग्णाना अपंगत्त्वाचा दाखला वेळीच मिळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करीत आहे ?
(४) असल्यास, कार्यवाहीचे स्वरूप काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०९-०१-२०१७) :**(१) नाही.

जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग-रायगड येथे अपंगाचे प्रमाणपत्र देण्यासाठी आठवड्यातील बुधवार हा दिवस निश्चित केलेला असून त्यादिवशी अपंग रुग्णांची विशेषज्ञांकडून तपासणीकरुन त्या आजाराने अपंगत्वाचे प्रमाणपत्र ऑनलाईन संगणकीय प्रणालीद्वारे दिले जाते. या रुग्णालयातून सन २०१३ ते माहे जुलै, २०१६ अखेर ५४८४ अपंग प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आली आहेत.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यात वैद्यकीय अधिक्षक व अधिकाऱ्यांची रिक्त पदे

**(१६) ६२३६८ (३०-०८-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यात वैद्यकीय अधिक्षक व वैद्यकीय अधिकारी यांची पदे रिक्त असल्याने जिल्ह्यात सार्वजनिक आरोग्याची व्यवस्था विस्कळीत झाली असल्याचे माहे जून, २०१६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यात वैद्यकीय अधिक्षकाची १५ व वैद्यकीय अधिकाऱ्यांची १९ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रिक्त पदे त्वरीत भरण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, याबाबत कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२४-०१-२०१७) :**(१) हे अंशत: खरे आहे.

सोलापूर जिल्ह्यातील उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयातील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वर्ग-१) मधील वैद्यकीय अधिक्षकांची २० पदे मंजूर आहेत. त्यापैकी ३ पदे भरलेली असून १७ पदे रिक्त आहेत. तसेच महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वर्ग-२) मधील वैद्यकीय अधिकाऱ्यांची एकूण ७१ पदे मंजूर असून त्यापैकी ४९ पदे भलेली असून २२ पदे रिक्त आहेत.

तसेच उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालय येथील रुग्णांना आरोग्य सेवा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने एकूण २५ विशेषज्ञांची पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यात आलेली असून त्यामार्फत रुग्णांना आरोग्य सेवा पुरविण्यात येतात.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ मधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजीव गांधी जीवनदायी योजनेच्या बदलण्यात आलेल्या स्वरूपाबाबत**

**(१७) ६२४०३ (३०-०८-२०१६). अॅड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राबविण्यात येत असलेल्या राजीव गांधी योजनेचे नाव व स्वरूप बदलण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु योजनेस नव्याने देण्यात येणारे नाव काय आहे आणि बदलण्यात येत असलेल्या स्वरुपाची थोडक्यात रूपरेषा काय आहे,

(३) असल्यास, सदर योजनेत नवीन कोणत्या आजारावरील उपचारांचा खर्च देय करण्यात आला आहे वा कोणत्या आजारावरील उपचारांचा खर्च वगळण्यात आला आहे,

(४) असल्यास, राज्यात स्वरूप व नाव बदललेल्या नवीन योजनेची अंमलबजावणी कधीपासून करण्यात येणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०९-०१-२०१७) :**(१) होय.

(२) दि. ७ जून, २०१६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयानुसार महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना संपुर्ण राज्यात नवीन स्वरुपात राबविण्यास दि. ४ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेमध्ये बदलण्यात आलेल्या स्वरुपाची थोडक्यात रुपरेषा खालीलप्रमाणे आहे.

अ) वार्षिक विमा संरक्षणाची मर्यादा १.५० लक्ष (मुत्रपिंड प्रत्यारोपणासाठी रु. २.५० लक्ष) एवढी होती, ही मर्यादा नवीन योजनेत रु. २.०० लक्ष (मुत्रपिंड प्रत्यारोपणासठी रु. ३.०० लक्ष) एवढी करण्यात आलेली आहे.

ब) नवीन योजनेत एकूण ३१ विशेषज्ञ सेवांतर्गत एकूण ११०० प्रोसिजर्सचा समावेश या योजनेत करण्यात आलेला आहे.

क) पुर्वीच्या योजनेत असलेल्या लाभार्थ्यांव्यतिरिक्त खालील नवीन लाभार्थ्यांचा समावेश या नवीन योजनेत करण्यात आलेला आहे.

१. शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थी, महिला आश्रमातील महिला, अनाथालयातील मुले, वृध्दाश्रमातील जेष्ठ नागरिक.

२. अधिस्वीकृतीधारक पत्रकार व त्यांच्यावर अवलंबून असणारे कुटुंब.

३. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगार

ड) योजनेमध्ये सहभागी होणाऱ्या अंगीकृत रुग्णालयांची कमाल मर्यादा नवीन योजनेंतर्गत काढून टाकण्यात आली असून जास्तीत जास्त रुग्णालये अंगीकृत करण्यात येणार आहेत. डोंगराळ / आदिवासी तसेच १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमधील रुग्णालये अंगीकृत होण्यासाठी निकष शिथील करुन कमीत कमी २० खाटांची मर्यादा ठेवण्यात आली आहे.

(३) पुर्वीच्या योजनेत असलेल्या ३० विशेषज्ञ सेवेवरील ९७१ उपचार पध्दतीपैकी अंत्यक कमी वापर असलेल्या १२१ पध्दती वगळण्यात येऊन २५० नवीन उपचार पध्दतींचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यामध्ये कर्करोग, बालक व वृध्दांवरील नवीन उपचार Hip & knee Replacement सिकलसेल, ॲनिमिया, डेंग्यू, स्वाईन फ्ल्यु इ. सारख्या नवीन उपचारांचा समावेश करण्यात आला आहे.

(४) सदर योजनेची अंमलबजावणी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात करण्यात येणार आहे.

---

## नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील वसतिगृह क्रमांक दोन मधील विद्यार्थीनींची वाहने पेटवून दिल्याबाबत

**(१८) ६३४९९ (२२-०८-२०१६). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील वसतिगृह क्रमांक दोन येथे बुधवार दिनांक १ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास मध्यरात्री विद्यार्थीनींची वाहने पेटवून दिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या सर्व प्रवेशद्वारांवर सुरक्षा यंत्रणा कार्यरत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुरक्षा यंत्रणा कार्यरत असताना मध्यरात्री विद्यार्थीनींची वाहने पेटवून देणाऱ्या एकाही व्यक्तीला अद्याप अटक करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या सुरक्षा यंत्रणेच्या अभावामुळे विद्यार्थीनींच्या वित्त व मुद्देमालाच्या सुरक्षेसह रुग्ण व नातेवाईक यांची सुध्दा सुरक्षा, धोक्यात आलेली आहे हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने संबधित सुरक्षा यंत्रणेसह दोषींवर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०२-२०१७)** :(१) होय.

(२) होय.

(३) सदर प्रकरणी पोलिसात गन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस तपास सुरु आहे. तथापि, अद्याप एकाही व्यक्तीला अटक करण्यात आली नाही हे खरे आहे.

(४) नाही, मुलींच्या वसतीगृहात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावणे, कंपाऊंड वॉलचे बांधकाम करणे, संस्था परिसरात अनावश्यक लोकांना प्रवेशबंदी आणि रुग्णालयाचे मुख्य प्रवेशद्वार सायंकाळी ०६.३० वाजता बंद करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

(५) सदर प्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस तपास सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयातील चिमूर, नागभीड तालुक्यामध्ये वनसंपदेवर आधारित पूरक उद्योगधंदे उभारण्याबाबत

**(१९) ६३५०१ (२४-०८-२०१६). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील चिमूर, नागभीड तालुक्यामध्ये फार मोठ्या प्रमाणावर वनसंपदा उपलब्ध आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दोन्ही तालुक्यामध्ये एकही मोठा उद्योग अस्तित्वात नसून येथील जनजीवन हे केवळ शेती व जंगल वनसंपदावर अवलंबून आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भागामध्ये वनसंपदेवर आधारित पूरक उद्योगधंदे उभारण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रोजगाराच्या पर्यायी उपाययोजना निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०२-२०१७)** :(१) चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी वन विभागातंर्गत नागभिड व चिंमूर तालुक्यामध्ये वनसंपदा असून, त्यामध्ये साग, येण, बिजा व इतर किसम प्रजातीचे वृक्ष उपलब्ध आहेत.

(२) चिमूर येथे एमआयडीसी क्षेत्र असून, एकूण ३४ भूखंड आहेत. त्यापैकी २८ भूखंडाचे वाटप झाले आहे. एमआयडीसी मध्ये सूक्ष्म व लघू ७ उद्योग सुरु आहेत. तसेच चिमूर तालुक्यात १२ उद्योग सुरु असून, त्यात ५ राईस मिलचा समावेश आहे. नागभिड येथे एमआयडीसी क्षेत्र असून, एकूण २९ भूखंड आहेत. त्यापैकी २४ भूखंडाचे वाटप झाले आहे. एमआयडीसी मध्ये सुक्ष्म व लघू ५ उद्योग सुरु आहेत. तसेच, नागभिड तालुक्यात २४ उद्योग सुरु असून, त्यात २१ राईस मिलचा समावेश आहे.

(३) औद्योगिक विकास समूह विकास योजनेअंतर्गत चिमूर रेडीमेंट गारमेंट औद्योगिक समूह मंजूर झाला असून, क्षमता वृध्दी कार्यक्रमास मंजूरी प्राप्त झालेली आहे. शासकीय धोरणानुसार

शासन मुलभूत सुविधा निर्माण करुन देते व उद्योग उभारणीस उत्तेजन देते. मात्र उद्योगाची निवड ही उद्योजकांनीच करावयाची असते.
(४) व (५) जिल्हा उद्योग केंद्रामार्फत बेरोजगार युवकांकरीता, सुधारीत बीज भांडवल योजना, जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना व पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम इ. योजना राबविण्यात येतात. तसेच, उद्योग सुरु झालेल्या सुक्ष्म व लघू उद्योजकांना सामूहीक प्रोत्साहन योजनेअंतर्गत विविध लाभ देण्यात येतात. तसेच, उद्योजकांना प्रोत्साहीत करण्याकरीता, शासनाचे विविध उपक्रम शासन स्तरावर सुरु आहेत.

---

**वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालयात एम.बी.बी.एस. साठी अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर न करताच प्रवेश दिल्याबाबत**

**(२०) ६३६६० (२२-०८-२०१६). श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०१३-१४ ते सन २०१५-१६ या तीन वर्षात १) इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर, २) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय लातूर, ३) लो.टिळक म.न.पा. सर्वसाधारण रूग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय शीव मुंबई, ४) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय औरगांबाद, ५) बायल नायर धर्मा रुग्णालय, टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय मुंबई सेंट्रल ६) ग्रॅन्ट शा.महाविद्यालय भायखळा, मुंबई ७) नायर रुग्णालय दंत महाविद्यालय,मुंबई सेंट्रल ८) एच.बी.टी.वैद्यकिय महाविद्यालय आणि कूपर रुग्णालय विलेपार्ले(प) ९) राजर्षि छत्रपती शाहू महाराज वैद्यकिय महाविद्यालय कोल्हापूर या वैद्यकीय महाविद्यालयात एम.बी.बी.एस. साठी अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर न करताच प्रवेश दिला गेला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रशासनाने जात वैधता प्रमाणपत्र न घेताच विद्यार्थ्यांना कोणत्या अटी/शर्तीच्या आधारावर प्रवेश दिला आहे,
(३) असल्यास, एकूण किती प्रवेशीत विद्यार्थ्यांनी प्रशासनाच्या अटी/ शर्तीची पूर्तता करून जात वैधता प्रमाणपत्रे सादर केली आहेत,
(४) असल्यास, ज्या विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्रे सादर केली नाहीत त्यांच्यावर वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रशासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, उक्त विद्यार्थ्यांवर कोणतीही कारवाई केली नसल्यास, अशा वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रशासनावर शासनाने कोणती कारवाई केली अथवा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०२-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे. ज्या उमेदवारांनी एमएच-सीईटीच्या मूळ अर्जामध्ये संवैधानिक आरक्षणाची मागणी केली आहे आणि ज्या उमेदवारांकडे जात प्रमाणपत्र उपलब्ध आहे. परंतु जात प्रमाणपत्र वैध करण्यासाठी संबंधित जात वैधता पडताळणी

समितीकडे अर्ज केल्याची पावती उपलब्ध आहे. अशा उमेदवारांना हमीपत्रांच्या आधारावर आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष पदवीपूर्व अभ्यासक्रमास प्रवेश दिले आहेत.

(२) मा.मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथील रिट याचिका क्रमांक ५६७५/२०१३ व इतर याचिकांमध्ये दिनांक १६/०७/२०१३ रोजी दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

(३) सन २०१३-१४ ते सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात प्रश्न क्रमांक १ मधील महाविद्यालयांमध्ये एकूण १११ पैकी ७१ उमेदवारांनी प्रवेशाच्या वेळेस जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेली आहेत.

(४) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांच्या दिनांक १६ फेब्रुवारी, २०१६ च्या पत्रान्वये सन २०१४-१५ पर्यंत पदवीपूर्व आणि पदव्युत्तर पदवी/पदविका अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांकडून जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करण्याबाबत सर्व शासकीय / महापालिका वैद्यकीय व दंत महाविद्यालयांच्या अधिष्ठातांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तिरोडा व गोरेगांव (जि. गोंदिया) तालुक्यातील झुडपी जंगल समस्येबाबत**

**(२१) ६३८६७ (२४-०८-२०१६). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिरोडा व गोरेगांव (जि. गोंदिया) तालुक्यातील शासकीय जमीनीवर झुडपी जंगल असे पट्टे नमूद आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक वर्षापासून या जमिनीवर झाडेच नाही, हे ही खरे आहे काय

(३) तसेच गोरेगांव व तिरोडा तालुक्यातील कार्यालयाच्या ७/१२ वर झुडपी जंगल नोंद आहे काय

(४) असल्यास, सदरहू जागेवर शासन ग्रामस्थांना मालकी हक्क देणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०१-२०१७) :**(१), (२) व (३) तिरोडा व गोरेगांव (जि.गोंदिया) तालुक्यातील महसूली गावात लहान खुरटी झुडपी जंगल असलेल्या सरकारी जमिनीचे अधिकार अभिलेख पत्रक ७/१२ वर जंगल सदृश्य झुडपी जंगल अशी भोगवटदार रकानी नोंद आहे.

(४) व (५) अनुसूचित जमाती व इतर पारंपारीक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम २००८ तसेच सुधारित नियम २०१२ मधील कलम ३ (१) अंतर्गत दिनांक १३/१२/२००५ पूर्वीचे वनजमिनीवरील दावे नियमानुकूल करुन दावेदारांना जमिनी वापरण्याचे हक्क देण्याबाबतची कार्यवाही जिल्हास्तरीय वनहक्का समितीकडून करण्यात येत आहे. आतापर्यंत तिरोडा व गोरेगाव तालुक्यात अनुक्रमे १९९ व १६२ दावेदारांचे हक्क कायम करण्यात आलेले आहेत.

केंद्र शासनाने दिनांक ०४/०३/२०१४ रोजीच्या पत्रान्वये विदर्भातील झुडपी जंगल जमिन वनेतर कामासाठी वळतीकरणास सुलभ कार्यपध्दतीने प्रस्ताव सादर करण्यास तत्वत: मान्यता दिली आहे. विदर्भातील सहा जिल्ह्यात झुडपी जंगल प्रकारात येणाऱ्या जमिनीपैकी ३ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्राच्या जमिन वनव्यवस्थापनाच्या दृष्टीने आयोग्य/अशक्त असणाऱ्या वनजमिनी व विनाव्यापारी तत्वावरील अतिक्रमणाखालील सुमारे ८६,४०९ हेक्टर झुडपी जंगल जमिनीचे वळतीकरणाचे प्रस्ताव वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत सुलभ प्रक्रियेद्वारे केंद्र शासनास सादर करण्यात येणार आहेत.

सदर झुडपी जंगल क्षेत्र महसूल खात्याच्या ताब्यात असून महसूल विभागाकडून वन विभागास प्रस्ताव सादर करण्यात येणार आहेत. सदर झुडपी जंगल वळतीकरणाची प्रक्रीया वेगाने होण्याकरीता शासनाने कालबध्द कार्यक्रम आखून दिला असून त्याप्रमाणे तातडीने कार्यवाही करण्याबाबत विभागीय आयुक्त, नागपूर व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत.

---

**उमरेड (जि. नागपूर) क-हांड अभयारण्यातील जय वाघ बेपत्ता असल्याबाबत**

**(२२) ६५४२० (२७-०१-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरेड (जि.नागपूर) कऱ्हांड अभयारण्यातील जय वाघ माहे एप्रिल, २०१६ महिन्यापासून बेपत्ता असल्याची धक्कादायक माहिती दिंनाक २० ऑक्टोंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अघापही रेडीओ कॉलर असलेल्या जय वाघाचे लोकेशन शोधण्यात वन विभागाला यश आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वनविभागाच्या दुर्लक्षपणामूळेच जय वाघ बेपत्ता झाला आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-०२-२०१७)** :(१) व (२) नागपूर जिल्ह्यातील उमरेड-कऱ्हांडला अभयारण्य व त्या लगतच्या क्षेत्रात जय नावाने प्रसिद्ध असलेला नर वाघाचा (कार्यालयीन नाव UK- T१) जून, २०१३ पासून वावर होता.

सदर वाघाला संशोधन व अभ्यासासाठी भारतीय वन्यजीव संस्थान यांचेकडून रेडिओ कॉलर लावली होती. सदर कॉलरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे त्याचा सॅटेलाईटशी संपर्क तुटला. त्यामुळे दिनांक १८.०४.२०१६ पासून संकेत येणे बंद झाल्यामुळे वाघाचे अचूक ठिकाण समजणे बंद झाले.

(३) व (४) सदर वाघाचा VHF च्या माध्यमातून ground tracking तसेच कॅमेरा ट्रॅपच्या सहाय्याने शोध घेणे, शोध घेण्यासाठी स्वतंत्र चमू लावणे, जवळपासच्या ग्रामस्थांकडे विचारणा करणे असे प्रयत्न करण्यात आले. तथापि सदर वाघाच्या अस्तित्वाबाबत अद्याप ठोस पुरावा मिळालेला नाही.

सदर वाघाचा शास्त्रिय अभ्यास करणाऱ्या भारतीय वन्यजीव संस्थानातील शास्त्रज्ञांनी त्याच्या बेपत्ता होण्याबाबत अशी शक्यता वर्तवली आहे की, उमरेड कऱ्हांडला अभयारण्यातील ९ छाव्यांपैकी ७ छावे नर असून ते आता अंदाजे दोन ते अडीच वर्षाचे होत आहेत. उमरेड कऱ्हांडला अभयारण्याचे १८७ चौ. कि.मी इतके कमी क्षेत्र विचारात घेता ७-८ नर वाघ एकत्र रहाणे शक्य नाही. त्यामुळे जयसारख्या अनुभवी नर वाघाने उमरेड कऱ्हांडला अभयारण्यातच राहून इतर तरुण नर वाघांना आव्हान न देता इतरत्र जाणे स्विकारले असणे तर्कसंगत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**श्रीगोंदा व कर्जत (जि.अहमदनगर) तालुक्यात माळढोक विकास करण्याच्या निर्णयाला गावकऱ्यांचा होत असलेला विरोध**

**(२३) ६६३७५ (०९-०१-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीगोंदा व कर्जत तालुक्यात (जि.अहमदनगर) येथे माळढोक विकास करण्याच्या शासनाच्या निर्णयाला गावकऱ्यांचा विरोध दर्शविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे का,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यांत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-०३-२०१७) :**(१) होय हे खरे आहे.
(२) व (३) शासन अधिसूचना दि. २७/०८/१९७९ व दि. १६/०९/१९८५ अन्वये अहमदनगर व सोलापूर जिल्हयातील ८४९६.४४ चौ.कि.मी क्षेत्र हे माळढोक पक्षी अभयारण्य म्हणून घोषित करण्यात आले होते. तद्‌नंतर शासन अधिसूचना दि. २७/०२/२०१२ नुसार अभयारण्याचे क्षेत्र १२२९.२४ चौ.कि.मी. इतके सिमीत करण्यात आले.

वन्यजीव (संरक्षण) अधिनियमातील तरतूदींच्या अनुषंगाने अभयारण्यातील राखीव वनेतर क्षेत्रासंदर्भात उपविभागीय अधिकारी हयांनी केलेल्या चौकशी अहवालातील शिफारसीनुसार सोलापूर जिल्हयातील संपादीत केलेल्या ४८०.२९ हेक्टर खाजगी क्षेत्र वगळता उर्वरीत खाजगी क्षेत्र वगळून शासन अधिसूचना दि. ०५.०३.२०१६ अन्वये अभयारण्याचे क्षेत्र ३६६.७३ चौ. कि.मी. इतके सिमीत करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चांदोली व कोयना अभयारण्य मिळून देशातील ३९ वा व्याघ्र प्रकल्प उभारण्याबाबत**

**(२४) ६६४३२ (०९-०१-२०१७). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदोली व कोयना अभयारण्य मिळून देशातील ३९ वा व्याघ्र प्रकल्प उभारण्याकरिता सन २००३ मध्ये सहयाद्री व्याघ्र प्रकल्पाचा प्रस्ताव दहा वर्षापूर्वी केंद्र शासनाकडे सादर केली, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या प्रस्तावावर अद्यापपर्यंत केंद्र शासनाने निर्णय न घेण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत राज्य शासनाकडून कशा प्रकारे पाठपुरावा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०१-२०१७) :**(१) व (२) राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण, भारत सरकार, पर्यावरण व वन मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दिलेल्या तत्वत: मान्यतेच्या आधारे शासन अधिसूचना क्रमांक:- डब्लयूएलपी १००८/ सीआर-२३२ / एफ-१, दिनांक :- ०५.०१.२०१० अन्वये चांदोली राष्ट्रीय उद्यान व कोयना अभयारण्याचे क्षेत्रास सहयाद्री व्याघ्र राखीव क्षेत्र म्हणून घोषित करणेत आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुरबाड तालुक्यातील (जि.ठाणे) माळशेज घाट परिसरात बिबटयाने हैदोस घातल्याबाबत**

**(२५) ६६७०८ (०९-०१-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड तालुक्यातील (जि.ठाणे) माळशेज घाट परिसर, फांगणे, झाडघरपठार टोकावडे येथे माहे ऑगस्ट, २०१६ पासून बिबटयाने हैदोस घातला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बिबटयाबाबत नागरिकांनी वन विभागाकडे तकारी करुन वन विभागाने गांभीर्याने लक्ष न घातल्याने मीराबाई वार या आदिवासी महिलेला आपला जीव गमवावा लागला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-०२-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) श्रीमती मीराबाई वरे ह्या आदिवासी महिलेचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला आहे हे खरे आहे.

बिबट्याचा धुमाकूळ रोखण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या होत्या.

• बिबट्याचा धुमाकुळ सुरु असलेल्या परिसरात वन कर्मचाऱ्यांमार्फत दिवस रात्र गस्त घालण्यात येत होती.

• स्थानिक गावकऱ्यांच्या बैठक घेण्यात येऊन जाहिर आवाहन व परिपत्रके वाटप करण्यात आली होती.

• बिबट्याला जेरबंद करण्याच्या अनुषंगाने उक्त परिसरात पिंजरे लावण्यात आले होते.

• जनक्षोभ लक्षात घेता मुख्य वन्यजीव रक्षक यांच्या पूर्वपरवानगीने धुमाकूळ घालणाऱ्या बिबट्यास ठार मारण्यात आले आहे.

---

**फणसाड (ता.अलिबाग, जि.रायगड) उसरोली फाटयावर अभयारण्यात सागवानाची चोरटी वाहतूक केल्याबाबत**

**(२६) ६६७३५ (०९-०१-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फणसाड (ता.अलिबाग, जि.रायगड) उसरोली फाटयाच्या अभयारण्यात सागवानाच्या टेम्पोवरुन चोरटी वाहतूक करणाऱ्यांवर वन अधिकाऱ्यांनी कोणतीही कारवाई केली नसल्याचे दिनांक २ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास घटना घडली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, वन खात्याने चोरटी वाहतूक करतांना वाहन किंवा माल पकडल्यास भारतीय वन अधिनियमानुसार गुन्हा दाखल करणे बंधनकारक असतांनाही सोडून दिल्याबाबत आक्षेप प्रादेशिक वन विभागाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तदनुसार यास जबाबदार असणाऱ्या दोषी व्यक्तीवर शासन स्तरावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-०३-२०१७) :**(१) व (२) होय हे खरे आहे.

(३) व (४) सदर प्रकरणातील प्राथमिक चौकशीत वनक्षेत्रपाल (वन्यजीव) फणसाड, वनपाल काशिद, वनरक्षक सर्वा यांनी वनगुन्हयाचा तपास चुकीचा करुन टेम्पोविरुध्द जप्तीची कार्यवाही न करता मुक्त केल्याचे निष्पन्न झाले आहे. शासकीय जंगलातील वृक्षतोडीस प्रथमदर्शनी जबाबदार दिसून आलेल्या वनरक्षक, सर्वा, वनरक्षक दांडा व वनपाल काशिद ह्यांना निलंबित करण्यात आलेले आहे. वनक्षेत्रपाल (वन्यजीव) फणसाड ह्यांना शिस्तभंगाची कारणदर्शक सूचना देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे पाचेगाव (ता.नेवासा, जि.अहमदनगर) या परिसरातील शेतात हरणांच्या कळपानी शेताचे नुकसान केल्याबाबत**

**(२७) ६६८९२ (०९-०१-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पाचेगाव (ता.नेवासा, जि.अहमदनगर) परिसरातील शेतात सोयाबीन, कपाशी बाजरी, भुईमूग इ पिकांची उगवण झाली असून त्यांच्या कोवळया पानांवर हरणाचे कळप ताव मारून सर्व फस्त करताहेत अशा तक्रारी स्थानिक शेतकऱ्यांनी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच हरणाप्रमाणे परराज्यातून आलेल्या गीर गायीची अशाच प्रकारे पिकांचे नुकसान करत आहेत, ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार काय कार्यवाही करण्यात आली अथवा करण्यात येणार आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०२-२०१७) :**(१) हे खरे नाही, तथापि सन २०१६-१७ ह्या आर्थिक वर्षात नेवासा तालुक्यात फक्त मौजे लोहगाव येथे शेत नुकसानीचे एक प्रकरण घडले असून संबंधित शेतकऱ्यास प्रचलित शासन निर्णयानुसार नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मळगांव (ता.साक्री, जि.धुळे) शिवारातील वनजमिनीवरील आदिवासींची घरकुले वनखात्यामार्फत जेसीबीने उद्वस्थ केल्याबाबत**

**(२८) ६७४३० (२७-०१-२०१७). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्ह्याच्या साक्री तालुक्याचे मळगांव शिवारातील वनजमिनीवरील १० आदिवासी इसमाची राहती घरकुले दिनांक २९ सप्टेंबर, २०१६ रोजी वनखात्यामार्फत जेसीबी लावुन उद्वस्थ करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पावसाळी हंगामात म्हणजे दिनांक ३१ ऑक्टोबर, अखेर पावेतो रेसिडन्टी अतिक्रमण खाली करु नये असे शासनाचे आदेश आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) सदरचे अतिक्रमण खाली करतांना वनखात्याने आर.एफ.ओ. व सब डि.एफ.ओ यांनी आदिवासी अतिक्रमण धारकांचे घर खाली करतांना घर सामानाची संसारपयोगी वस्तूची जे.सी.बी. च्या सहायाने नासधुस केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०२-२०१७) :**(१) धुळे जिल्हयांतील साक्री तालुक्यातील, पिंपळनेर वनपरिक्षेत्रातील पानखेडा बिटातील, राखीव वनातील कम्पां नं. १९३ मधील वनजमिनीवर १० आदिवासी इसमांनी १.७५ हे. क्षेत्रावर अतिक्रमण करुन झोपडया उभारल्या होत्या.

त्याच्याविरुध्द वनपाल पिंपळनेर यांनी दि. १०.६.२०१६ रोजी वन गुन्हा क्र. ९/१०-६-२०१६ जारी केला व दिनांक २९.९.२०१६ रोजी वन विभागामार्फत वनजमिनीवरील अतिक्रमण हटविण्यात आले आहे.

(२) शासन परिपत्रक दिनांक १५.७.२००५ मध्ये वन जमिनीवरील अनधिकृत बांधकामे/ अतिक्रमणे/ झोपड्या तात्काळ हटविण्यात याव्यात असे नमूद करण्यात आले आहे. सदर प्रकरणी अतिक्रमकांना स्वत: अतिक्रमण हटविण्यासाठी पुरेशी संधी देण्यात आली. मात्र त्यांनी तसे न केल्याने सदर अतिक्रमण भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम २६- १A(a) अन्वये हटविण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) हे खरे नाही.

सदर प्रकरणी भारतीय वन अधिनियम, १९२७ नुसार कार्यवाही करण्यात आली असून कोणतेही अधिकारी दोषी असल्याचे निदर्शनास आले नाही.

---

**वेल्हे (जि.पुणे) तालुक्यात रानडुकरांच्या कळपाने पिकाचे**
**नुकसान केल्यामुळे भरपाई मिळणेबाबतची मागणी**

**(२९) ६७४६२ (०९-०१-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेल्हे (जि.पुणे) तालुका हा डोंगरदऱ्यातून व जंगलाने विखुरलेला असल्याने शेतकऱ्यांची रानडुकरांच्या कळपाने पिकांचे नुकसान केले असून सदर पिकाचे वन विभागाने पंचनामे करुन नुकसान भरपाई मिळणेबाबतची मागणी दिनांक १५ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास करण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने रितसर पंचनामे केले आहेत काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-०२-२०१७) :**(१) हे खरे नाही.

तथापि दिनांक २७.११.२०१६ रोजी रानडुकर या वन्यप्राण्यांनी शेतपिकांचे नुकसान केल्याचे ३ अर्ज प्राप्त झाले असता प्रचलित शासन निर्णयानुसार संबंधित शेतकऱ्यास नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे गुंजवणे (ता.वेल्हे, जि.पुणे) येथील वन विभागाने बांधलेल्या**
**पाझर तलावाचे काम निकृष्ट झाल्याबाबत**

**(३०) ६७४८१ (१६-१२-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गुंजवणे (ता.वेल्हे, जि.पुणे) येथील वन विभागाने बांधलेल्या पाझर तलावाचे निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे सांडवा फुटून भूस्खलन होवून गावाला पाणी पुरवठा करणारा दुसरा पाझर तलाव गाळाने भरल्याने पिण्याच्या पाण्याची टंचाई मागील दोन वर्षापासून जाणवू लागल्याचे प्रकार दिनांक ७ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०२-२०१७)** :(१) व (२) अंशत: खरे आहे.

सन २०१४-१५ या वर्षामध्ये राज्य पर्यटन योजनेंतर्गत वनक्षेत्रामध्ये पर्यटन विषयक कामे राज्यस्तरीय योजना अंतर्गत ई-निविदेद्वारे नसरापुर वनपरिक्षेत्रामध्ये मौजे गुंजवणे फॉरेस्ट कंपार्टमेंट नंबर ४१५ मध्ये एक माती नालाबांध बांधणेचे काम करण्यात आलेले आहे. सदर काम २३ मार्च, २०१५ ते दि. ३१ मार्च, २०१५ या कालावधीत पुणे केलेले आहे.

दिनांक २२/०६/२०१५ रोजी एकूण १० तासामध्ये १४८.०८ मी.मी. पाऊस (मौजे साखर, येथील मापन केंद्रामधील नोंदीनुसार) झाला. या अतिवृष्टीमुळे पाणलोट क्षेत्राती पाणी तीव्र उतार असल्याने ओढ्यातून तीव्रतेने माती नाला बांधामध्ये आले. परिणामी माती नाला बांध पुर्ण भरुन सांडव्याद्वारे पाणी बाहेर पडले. त्यामुळे सांडव्यातील माती ५ मीटर खोलीने वाहून जावून दरी तयार झालेली होती. एवढ्या मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी होऊनही बंधाऱ्यास कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेले नाही. तसेच मातीबंधाऱ्यांच्या उत्तर बाजुने अगर इतर बाजूने माती खणन झालेले नाही. सदरची घटना घडल्यानंतर सांडव्यास पडलेली दरी बुजविण्याचे कामीगावातील जाणकार प्रतिष्ठीत नागरीक, पत्रकार इ. आणि वन अधिकारी यांनी एक बैठक घेवून सांडव्यातील माती पुढील पावसाळ्याच्या कालावधीत वाहून जावू नये म्हणून स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने व सल्ल्याने तांत्रिकदृष्ट्या विचार करुन सांडव्याचे काम पुर्ण करुन त्याचा पंचानामा केलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात सन २०१५-१६ या वर्षात अवैध वृक्षतोडीची १५ हजार ४५७ प्रकरणे

**(३१) ६७५५७ (०९-०१-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वन विभागाच्या आकडेवाडीनुसार राज्यात सन २०१५-१६ या वर्षात अवैध वृक्षतोडीची १५ हजार ४५७ प्रकरणे निदर्शनास आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार १ लाख ३ हजार ४१४ झाडे तोडण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इतक्या मोठ्या प्रमाणात होणारी वृक्षतोड रोखण्यासाठी वन विभागाने कोणती कार्यवाही सुरु केली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-०२-२०१७)** :(१) व (२) राज्यात वन विभागाच्या आकडेवारीनुसार सन २०१५-१६ या वर्षात अवैध वृक्षतोडीची २०,४२५ वनगुन्हे प्रकरणे निदर्शनास आली असून त्यामध्ये ९८,४६३ झाडे तोडण्यात आली आहेत.
(३) अवैध वृक्षतोड होऊ नये म्हणून खालीलप्रमाणे उपाययोजना राबविण्यात येतात :-

१) क्षेत्रिय कर्मचारी यांचेकडून वनक्षेत्राची नियमित गस्त करणे, धाडी टाकणे, नाकाबंदी करणे इ. नियमित कर्तव्य बजावत असतात.

२) अधिकारी / कर्मचाऱ्यांतर्फे वनक्षेत्रास नियमित भेटी देणे.

३) लोकांकडून वनविभागातील अवैध घटनांची माहिती प्राप्त होण्यासाठी वन विभागाकरीता १९२६ हा टोल फ्री क्रमांक उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

४) राज्यामध्ये मोक्याच्या ठिकाणी तपासणी नाके उभारण्यात आलेले आहेत. त्यात वाहतुकीतील वनोपजाची तपासणी केली जाते.

५) शासन निर्णय दिनांक ५.२.२०१३ अन्वये पोलीस विभागाच्या धर्तीवर खबऱ्यांचे जाळे विकसीत करण्यासाठी वनविभागात गुप्त सेवा निधी स्थापन करण्यात आला आहे.

६) राज्यात फिरते पथक गठीत करण्यात आले असून सद्य:स्थितीत ८० फिरते पथक कार्यरत आहे. यामुळे अवैध वृक्षतोड व इतर वनगुन्हेस प्रभावीपणे आळा घालण्यात येत आहे.

७) वनामध्ये अवैध कटाई व अवैध वाहतुक यावर नियंत्रण ठेवण्यासाठी १३८ वनसंरक्षक कुट्या कार्यान्वीत आहे.

८) राज्यात १२५९५ संयुक्त वनव्यवस्थापन समित्या स्थापन करण्यात आलेल्या असून त्यांच्याद्वारे अवैध वृक्षतोड वनाचे संरक्षण करणे इ. कामे केली जातात.

९) अवैध वृक्षतोड, अवैध वाहतुक, सराईत गुन्हेगार यांच्यावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने प्रत्येक बिटाचे निरिक्षण मापदंडानुसार करण्यात येते.

१०) सन २०१५-१६ मध्ये वनसंरक्षणाकरीता ३८४ जीप करण्यास शासनाने मंजूरी दिली असून सदर जीप खरेदी करण्यात आलेल्या आहे. सदर वाहनांचा उपयोग प्रभावी / जलद गस्तीकरीता व वनगुन्हेंगार नियंत्रण करणेकरीता होतो.

११) शासन निर्णय दिनांक १२.८.२०१६ अन्वये महाराष्ट्र राज्यात अवैध वृक्षतोडीवर परिणामकारकरित्या नियंत्रण ठेवण्याकरीता दोन प्रकारच्या पध्दती राबविण्याचे निर्धारीत केले गेले आहे.

१२) अवैध वृक्षतोडीसाठी जास्त संवेदनशील असलेल्या नागपूर, ठाणे, धुळे चंद्रपूर व अमरावती, मुंबई (वन्यजीव) व नागपूर (वन्यजीव) येथे वनसंरक्षणाकरीता बिनतारी संदेश यंत्रणा कार्यान्वित आहे.

१३) वन अधिकारी यांना स्वरंक्षणासाठी शस्त्र म्हणून ९ एमएम पिस्तोल व रायफल एसएलआर उपलब्ध करुन देणेत आले आहे.

१४) शासन निर्णय दिनांक १३.११.२०१४ अन्वये वन विभागासाठी कंत्राटी पध्दतीने ११ विधी सल्लागाराची नियुक्ती करण्यास शासन मान्यता प्राप्त असून ११ वनवृत्त विधी सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे.

१५) शासन निर्णय दिनांक १३.८.२०१४ अन्वये वनसंरक्षणाचे मापदंडामध्ये व्यापक सुधारणा होऊन सर्वकर्ष दिशानिर्देश जारी करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये सर्वच नियतक्षेत्रे अतिसंवेदनशील ठरविण्यात आले आहेत त्यानुसार तपासणी करणेत येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे करवंड (ता.चिखली, जि.बुलडाणा) येथे पपईच्या रोपांचे वन्यप्राणीनी केलेल्या नुकसानीची भरपाई देण्याबाबत**

**(३२) ६७८४० (२७-०१-२०१७). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे करवंड (ता.चिखली, जि.बुलडाणा) येथील अ.रशीद आ.कदीर यांचे शेत स.न.७६ मधील ०.८१ आर जमिनीवर १००० पपईची रोपांची लागवड केली, त्यापैकी दिनांक ६ मे, २०१६ रोजी वन्यप्राणीनी (निलगाय) ५०० ते ६०० झाडांची नासधूस केल्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झाले, याप्रकरणी या शेतकऱ्यांने उप वनसंरक्षक बुलढाणा यांना नुकसान भरपाई देण्याबाबत लेखी अर्ज दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी उप वनसरंक्षक यांनी खोटा पंचनामा करुन पंचनाम्यावर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची खोटी सही केली व दिनांक ९ जुलै, २०१५ च्या शासन निर्णयानुसार सदर शेतकऱ्याला रु. ३ लक्ष नुकसान भरपाई देण्याऐवजी फक्त १९,००० रुपये देण्यात आले असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पंचनाम्यावर शेतकऱ्यांची खोटी सही करुन शेतकऱ्यांची फसवणूक केल्याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) अद्याप याप्रकरणी कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-०२-२०१७)** :(१), (२) व (३) श्री. अब्दुल रशीद कदीर, रा.करवंद, ता.चिखली, जि.बुलढाणा यांचे शेतातील ५५० पपई या फळझाडाचे रोही (निलगाय) या वन्यप्राण्यांनी नुकसान केले आहे. प्रस्तुत प्रकरणी प्रचलित शासन निर्णयाच्या तरतूदीनुसार संबंधितास रु. २,७६,०००/- इतकी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गगनबावडा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील परिसरात गवा रेडयांचा उपद्रवाबाबत**

**(३३) ६७९७० (२७-०१-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील पन्हाळा तालुक्यातील धामणी खोऱ्यातील चौके, मानबेट, गारीवडे, बावेली, जर्गी, ता. गगनबावडा व परिसरातील गांवामध्ये प्रतिवर्षी माहे नोव्हेंबर व डिसेंबरमध्ये महिन्यामध्ये मोठया प्रमाणात गवा रेडयांचा उपद्रव वाढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिसरातील शेतीमध्ये वावरणाऱ्या गव्यांच्या कळपाने नव्याने लागण केलेले ऊसाचे व इतर पीकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान केल्याचे वन विभागाचे निदर्शनास आणण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गवा रेडयांचा शेतीतील उपद्रव कमी करण्याकरिता वन विभागाने जंगलामध्ये वनतळी बांधणे, गव्यांचा चारा असणाऱ्या विशिष्ठ बाबूंची लागवड करणे किंवा डोंगर पायथ्याशी चर खोदणे असे उपाय वन विभागाने केले आहेत काय,

(४) अद्यापि कोणतीच उपाययोजना केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-०२-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.

(३) गवा तसेच एकंदरीत मानव - वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या दृष्टीने वनक्षेत्राच्या हद्दीवर आवश्यकतेनुसार वन्यप्राणी प्रतिबंधक चर खोदण्यात आले आहेत. वन्यप्राण्यांना वनक्षेत्रातच पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे ह्या दृष्टीने वनतळी, माती बंधारे व सिमेंट बंधारे बांधणे कामे, सलग समतल चर घेणे, जलस्रोत बळकट करणे अशा उपाययोजना वन विभागाकडून करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धमधमी (ता.मालेगाव, जि.वाशिम) येथे शेतकऱ्यांच्या शेतातील परवानगी न घेता झाडांची वृक्षतोड केल्याबाबत**

**(३४) ६८३०१ (०९-०१-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धमधमी (ता.मालेगाव, जि.वाशिम) येथे शेतकऱ्याच्या शेतीतील १०० सागवान झाडांची वृक्षतोड करून त्या शेतकऱ्याची कोणतीही परवानगी न घेता ती तोडून गावाच्या शेजारी नेवून जमा केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंबधीत मुख्य वनरक्षक यवतमाळ व तहसिलदार मालेगाव व पोलीस ठाणे, जऊळका यांच्याकडे आदिवासी शेतमालकाकडून तक्रार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करून संबधित वनविभागाच्या अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-०३-२०१७) :**(१) धमधमी (ता.मालेगाव, जि.वाशिम) येथील शेतकरी श्री.महादेव डाखोरे यांनी त्यांच्या शेतातील १०० वृक्षांची तोड वृक्ष अधिकारी तथा परिक्षेत्र अधिकारी यांचे परवानागीशिवाय मजुरांकडून करुन घेतल्याचा निष्कर्ष जून, २०१५ च्या चौकशी अहवालान्वये निदर्शनास आला आहे.
(२) हे खरे आहे.
(३) चौकशी अहवालानुसार श्री.महादेव डाखोरे यांचे गट क्र. २१, २३, २४ मौजा धमधमी येथील १०५ झाडांची तोड वृक्ष अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, वाशिम यांचे परवानगी शिवाय श्री.महादेव डाखोरे यांनीच मजुरांकरवी करुन घेतल्याचा निष्कर्ष काढला असुन सदर सागवान वृक्षांची तोड श्री. महादेव डाखोरे यांचे परवानगी शिवाय केली यात तथ्यांश दिसुन येत नसल्याचे निष्कर्ष आहेत. तथापि वृक्ष अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, वाशिम व सहायक वनसंरक्षक (तेंदु) वाशिम यांनी खाजगी गट क्र. २५ मौजा वडदरी मधील प्रकरण हाताळताना तसेच मौजा धमधमी येथे अवैध वृक्षतोडीच्या संबंधाने प्रकरण हाताळताना केलेल्या अनियमिततेमुळे संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करणेत आली असून संबंधित सहाय्यक वनसंरक्षक, वनपाल व वनरक्षक यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्याची कार्यवाही प्रक्रियेत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे हसणेगाव-दाजीपूर अभयारण्य (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) या गावच्या हद्दीत बेकायदेशीररित्या जमीन खरेदी करुन बांधकाम केल्याबाबत**

**(३५) ६९१२३ (०९-०१-२०१७). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे हसणेगाव-दाजीपूर अभयारण्य (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) या गावच्या हद्दीत बेकायदेशीररित्या जमीन खरेदी करुन हॉटेल व लॉज बांधुन गेल्या ५ ते १० वर्षापासून त्या जागेच्या व्यवसायीक वापर करणाऱ्या ८ व्यक्तीविरोधात विभागीय वन अधिकारी एस.एस.झुरे यांनी गुन्हा दाखल केल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कोणत्याही प्रकारचे बांधकाम व उत्खन्न कोर झोनमध्ये शासकीय नियमानुसार बंदी असतानाही बेकायदेशीर बांधकाम करणाऱ्या संबंधित व्यक्तींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(३) असल्यास, वन विभागाच्या संबंधित जबाबदार अधिकाऱ्याविरोधात कारवाई न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) तसेच बेकायदेशीर करण्यात आलेले बांधकाम निष्कषित करण्यात आले आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३१-०१-२०१७)** :(१) व (२) राधानगरी (वन्यजीव) अभयारण्यातील मौ. हसणैपैकी तांबेवाडी येथील मा.ग.नं. १५९ मधील जमिनीवर रिसॉर्ट सदृष्य इमारतीचे बांधकाम केल्या प्रकरणी ८ व्यक्तीविरुध्द दिनांक ०६.१०.२०१६ रोजी प्रथम प्रतिवृत्त वनगुन्हा नोंद करण्यात आला असून त्या अनुषंगाने पुढील आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

(४) प्रस्तुत प्रकरणी अद्याप तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कवदरी व कोळेगाव (जि.वाशीम) येथे ट्रिपॅनोसोमा या परजिवी विषाणूने गोचिडवर्गीय माशीमध्ये शिरकाव केल्याने वन्यप्राण्याचा मृत्यू झाल्याबाबत

**(३६) ६९३७८ (२७-०१-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आफ्रिकन हरणांच्या रक्तात आढळणाऱ्या ट्रिपॅनोसोमा या परजिवी विषाणूने भारतात आढळणाऱ्या त्सेल्से (ग्लॉसिना पल्पॅलिस) या गोचीडवर्गीय माशीमध्ये शिरकाव केला असून कुठल्याही प्राण्याच्या शरीरातून रक्त शोधून घेत असताना संक्रमिक होणारा हा घातक विषाणू आता राज्यातील अभयारण्यातील श्वापदाकरीता घातक सिध्द ठरत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विषाणूमुळे वाशिम जिल्हयातील कवरदरी शिवारात एका बिबटयाचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन अभयारण्या लगतच्या गावांमध्ये व जंगलातील जनावरांचा अकाली मृत्यू होऊ नये याकरिता लसीकरणाचा मोहीम हाती घेण्याबाबत कोणतीच कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-०३-२०१७)** :(१) व (२) दिनांक २५.०७.२०१६ रोजी वाशिम जिल्हयातील कवरदरी येथे बिबट अस्वस्थ अवस्थेत आढळून आला त्याला उपराचारासाठी पशुवैद्यकीय महाविद्यालय, अकोला येथे घेऊन जाण्यात आले. उपचारा दरम्यान सदर बिबट्याचा मृत्यू झाला.

पशु वैद्यकीय अधिकारी अकोला यांनी बिबट्याचे रक्तात ट्रिपॅनोसोमा असल्याचे नाकारता येत नाही असे शवविच्छेदन अहवालात नमूद केले आहे. सदर बिबट्याच्या अवयवाचे नमुने न्याय वैद्यकीय प्रयोगशाळा, औरंगाबाद येथे तपासणीकरता पाठवण्यात आले आहेत.

(३) व (४) वाशिम जिल्हयात ७ पाळीव जनावरांचे रक्त नमुने परजिवीसाठी सकारात्मक आलेले होते, सदर जनावरे औषधोपचारांती पूर्णपणे बरी झाली आहेत.

ट्रिपॅनोसोमायसिस ह्या रोगावर कोणत्याही प्रकारची लस उपलब्ध नसून या रोगाबाबत कोणत्याही प्रकारे रोगप्रतिबंधक लसीकरण मोहिम घेण्यात आलेली नाही.

---

### राज्यात माहे जुलै, २०१६ पर्यंत ८ वाघांचा मृत्यू झाल्याबाबत

**(३७) ६९४१९ (०९-०१-२०१७). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे जुलै, २०१६ पर्यंत ८ वाघांचा मृत्यू झाल्याची माहिती सन २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन वाघांची शिकारी रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०१-२०१७) :**(१) व (२) माहे जानेवारी, २०१६ ते जुलै, २०१६ या कालावधीमध्ये राज्यात नैसर्गिकरित्या ९ वाघांचा तर अपघाताने १ वाघाचा मृत्यू झालेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कणकवली (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील वनक्षेत्रपाल यांच्यावर कारवाई करण्याबाबत

**(३८) ६९५२५ (१६-०१-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कणकवली तालुक्यातील वनक्षेत्रपाल कार्यालयात माहे ऑगस्ट २०१६ मध्ये एसीबी कडून कार्यवाही करण्यात आली यात वन विभागाचे २ कर्मचारी लाच स्वीकारताना पकडण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कार्यवाहीत वनक्षेत्रपाल आर.एस. पाटील यांनी लाच मागीतलेली असल्याचे ही निदर्शनास आले व तसा कबुली जबाब सदर कर्मचारी व तक्रारदार यांनी माहीती दिली, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर प्रकरणी लोकप्रतिनिधीनी दोषींवर कारवाई करण्याचे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याचे मा.मुख्यमंत्री, मा.वने मंत्री व वन सचिव यांच्या निदर्शनास आणून दिले, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, त्या अनुषंगाने दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-०२-२०१७) :**(१) होय, दि. २५.८.२०१६ रोजी कणकवली वनक्षेत्रपाल कार्यालयात वन विभागाचे दोन कर्मचाऱ्यांना लाच स्वीकारताना पकडण्यात आले हे खरे आहे.

(२) नाही.

(३) व (४) होय, या अनुषंगाने लाच स्वीकारताना पकडण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्यात आले असून त्यांच्याविरुध्द कणकवली पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद

क्र.१८५/१६, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम ७, १३ (१) (ड) सह १३ (२) प्रमाणे दि. २६.८.२०१६ रोजी ०३.१७ वा. गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात गत अडीज वर्षात १७६ बिबटयांच्या विविध कारणामुळे मृत्यू झाल्याबाबत**

**(३९) ६९५६८ (०९-०१-२०१७). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गत अडीज वर्षात १७६ बिबटयांच्या विविध कारणामुळे मृत्यू झाल्याची बाब दिनांक १७ सप्टेंबर २०१६ रोजी निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यातील नैसर्गिक रित्या ६८ तर १८ बिबटयांची शिकार झाल्यांची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास बिबटयांना मानवी वस्तीत येण्यापासून रोखण्यासाठी लोक किटकनाशकांचा वापर करतात त्यामुळे मोठया प्रमाणात बिबटयांचा बळी जातो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासन यावर कोणती कार्यवाही करणार आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०१-२०१७)** :(१) व (२) जानेवारी, २०१४ ते माहे जून, २०१६ या अडीच वर्षाच्या कालावधीमध्ये राज्यात नैसर्गिकरित्या-८६, अपघाताने-७३ तर शिकारीमुळे-१७ अशा प्रकारे १७६ बिबट्यांचा मृत्यू झालेला आहे.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामधील अनुसूचित जमाती करिता राखीव असलेल्य विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे बोगस असल्याबाबत**

**(४०) ७००४२ (१६-०१-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमधील अनुसूचित जमाती करिता राखीव असलेल्या वैद्यकीय व दंत पदवीच्या जागांवर प्रवेश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जात प्रमाणपत्र पडताळणी केली असता १८ विद्यार्थ्यांची अनुसूचित जमाती करिताची प्रमाणपत्रे बोगस असल्याचे दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाप्रमाणे जेबीआयएमएस, वेलिंगकर, सिडनहॅम या नामांकित खासगी महाविद्यालयातील बोगस जात प्रमाणपत्राच्या आधारे विद्यार्थ्यांनी यावर्षीही प्रवेश घेतल्याची बाब निदर्शनास आल्याने राज्याच्या तंत्रशिक्षण संचालयाने त्यांचे प्रवेश रद्द केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बोगस जात प्रमाणपत्राद्वारे प्रवेश मिळविणाऱ्या गुन्हे दाखल करण्यात आले आहेत काय वा कारवाईची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०२-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे. एकूण १९ विद्यार्थ्यांची अनुसूचित जमातीकरिताची प्रमाणपत्रे बोगस असल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या (एम.बी.बी.एस व बी.डी.एस) प्रवेशादरम्यान दोषी विद्यार्थ्यांविरुध्द त्या त्या महाविद्यालयांच्या अधिष्ठातांमार्फत गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत व त्याबाबतची पुढील चौकशी पोलीस विभागामार्फत सुरु आहे.

तसेच, एमबीए/एमएमएस पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात बनावट आणि जात वैधता प्रमाणपत्राच्या आधारे प्रवेश घेतले त्यांच्यावर नजीकच्या पोलीस स्टेशनमध्ये संबंधित संस्थांकडून गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

---

**राज्यात शेळी मेंढया पालनाचा व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना वन क्षेत्रातील राखीव असलेल्या वन जमिनीवर शेळी मेंढयांना चराईसाठी परवानगी मिळण्याबाबत**

**(४१) ७०२५९ (०९-०१-२०१७). श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शेळी मेंढया पालनाचा व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना वन क्षेत्रातील राखीव असलेल्या वन जमिनीवर शेळी मेंढयांना चराईसाठी परवानगी मिळण्याबाबत मा. मंत्री वने यांच्याकडे आमगाव लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरची कार्यवाही किती कालावधीत करण्यात येईल ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०२-२०१७) :**(१) व (२) परप्रांतीय मेंढ्यांवर व जंगलात केलेली चराई बंदी उठविण्याच्या अनुषंगाने श्री. संजय पुराम, विधान सभा सदस्य (आमगांव) यांनी मा. मंत्री वने यांच्याकडे दिनांक २३.०८.२०१६ रोजी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय.

वनक्षेत्रातील गुरे चराई धोरणानुसार शेळी चराईस बंदी आहे. मेंढी चराईसाठी राज्यातील २१ वन विभागात काही प्रमाणात वनक्षेत्र उपलब्ध करुन देण्यात आले आहे. राज्यातील वन क्षेत्राची मर्यादीत उपलब्धता विचारात घेता परप्रांतीय मेंढ्याना चराईसाठी वन क्षेत्र उपलब्ध करुन देण्यासाठी अनुकूल परिस्थिती नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर येथील माळढोक पक्षी अभयारण्याच्या इको सेन्सिटिव्ह झोनमुळे सोलापूरच्या विकासकाला बाधा येत असल्याबाबत**

**(४२) ७०४२५ (२७-०१-२०१७). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथील माळढोक पक्षी अभयारण्याच्या क्षेत्रालगत लागू करण्यात येत असलेला इको सेन्सिटिव्ह झोनमुळे सोलापूरच्या विकासकाला बाधा येत असल्याने सदर झोन रद्द करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर, २०१६ च्या दुसऱ्या सप्ताहात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०२-२०१७) :**(१) सोलापूर येथील अभयारण्याच्या इको सेन्सिटिव्ह झोनमुळे सोलापूरच्या औद्योगिक विकासाला अडसर निर्माण झाल्याने औद्योगिक क्षेत्रापुरती इको सेन्सिटिव्ह झोनची अट शिथिल करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर, २०१६ च्या दुस-या सप्ताहात मा. मुख्यमंत्री यांचेकडे केली आहे.

(२) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार संरक्षित क्षेत्राच्या इको सेन्सिटिव्ह झोनची अंतिम अधिसूचना जारी होईपर्यंत १० कि.मी. पर्यंतचे क्षेत्र मानीव पर्यावरण संवेदनशील क्षेत्र मानले जाते, तथापि वन्यजीव अधिवासाचा विचार करुन संरक्षित क्षेत्र सापेक्ष पर्यावरण संवेदनशील क्षेत्र प्रस्तावित करण्याचे शासन धोरण आहे, त्यानुसार माळढोक पक्षी अभयारण्याच्या पर्यावरण संवेदनशील क्षेत्राचा प्रस्ताव तयार करण्याचे काम चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंदगड व आजरा तालुक्यातील (जि.कोल्हापूर) हत्तींचा बंदोबस्त करण्याची मागणी**

**(४३) ७११६३ (०९-०१-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड व आजरा तालुक्यातील हत्तींचा बंदोबस्त करण्याची मागणी मा.वने मंत्री, वनक्षेत्रपाल यांचेकडे माहे ऑगस्ट २०१६ च्या शेवटच्या सप्ताहात स्थानिक नागरीकांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०२-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) मानव-हत्ती संघर्ष कमी करण्याच्या दृष्टीने क्षेत्रीय वन अधिकारी व कर्मचारी यांची गस्त पथके तसेच हाकारा गट निर्माण करण्यात आलेले आहेत. वन्यहत्तींच्या हालचालीवर नियंत्रण ठेवण्यात येऊन त्यांना मानवी वस्तीपासून दूर ठेवण्यात येत आहे.

वन्यहत्ती बांधित क्षेत्रात वन्यहत्ती प्रतिबंधक चर खोदण्यात आले आहे. क्षेत्रिय अधिकारी / कर्मचाऱ्यांना आवश्यकतेनुसार वाहनांची सोय, हातवाही संच इत्यादी सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.

वन्यप्राण्यांना वनक्षेत्रातच पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे ह्या दृष्टीने वनतळी, माती बंधारे व सिमेंट बंधारे बांधणे कामे, सलग समतल चर घेणे, जलस्रोत बळकट करणे अशा उपाययोजना वन विभागाकडून करण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जातेगांव (ता.नांदगांव, जि.नाशिक) येथील अतिप्राचीन पिनाकेश्वर मंदिर परिसराचा वनपर्यटन योजनेत समावेश करून मंजुरी मिळणेबाबत

**(४४) ७१२३२ (२७-०१-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील नांदगांव तालुक्यातील जातेगांव येथील अतिप्राचीन पिनाकेश्वर मंदिर परिसराचा वनपर्यटन योजनेत समावेश करण्याबाबतचे सर्वेक्षन उपवन संरक्षक पूर्व भाग नाशिक या कार्यालयाने केलेले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास उपरोक्त वनपर्यटनास मंजुरी देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे संबधित कार्यालयाने सादर केलेला आहे काय

(३) असल्यास उपरोक्त वनपर्यटनाच्या प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-०२-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) जातेगांव (ता.नांदगाव, जि.नाशिक) येथील अतिप्राचीन पिनाकेश्वर मंदिर परिसराचा वन पर्यटन स्थळ म्हणून विकास करण्याच्या अनुषंगाने मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांनी रु. ४२३.०० लक्षचा पंचवार्षिक आराखडा तयार केला आहे. सदरहू आराखड्यामध्ये प्रस्तावित केलेल्या कामांना तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी घेण्याची कार्यवाही क्षेत्रीयस्तरावर चालू आहे.

सदरहू प्रस्ताव क्षेत्रीय कार्यालयाकडून अद्याप पर्यंत शासनास प्राप्त झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे परधाडी (ता.नांदगाव, जि.नाशिक) येथील वन विभागाच्या वन क्षेत्रातील पाझर तलावाची दुरुस्ती करण्याबाबत**

**(४५) ७१२३४ (०९-०१-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे परधाडी (ता.नांदगांव, जि.नाशिक) गावाचा सन २०१५-१६ जलयुक्त शिवार अभियानाअंतर्गत समावेश असल्यामुळे वन विभागाच्या वन क्षेत्रातील पाझर तलावाची दुरुस्ती करण्याबाबतची मागणी येथील दिनांक २६ जानेवारी २०१६ च्या ग्रामसभेने उपवन संरक्षक पूर्व भाग नाशिक या कार्यालयाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उपवन संरक्षक पूर्व भाग नाशिक या कार्यालयाने उपरोक्त गावातील पाझर तलावाची दुरुस्ती करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही केलेली नसल्यास विलंबनाची करणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०२-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) उप वनसंरक्षक, पुर्व भाग नाशिक यांनी दि. १०.०६.२०१६ रोजी मौजे परधाडी (ता.नांदगाव, जि.नाशिक) येथील पाझर तलावातील गाळ काढणे व दुरुस्ती कामांसाठी परवानगी दिली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अवैध वृक्षतोड आणि उपाययोजनामध्ये गुप्त सेवा निधीप्रमाणे पर्यावरण रक्षण, संवर्धन आणि वृक्ष जोपासना करणा-या शेतक-यांना "पर्यावरण निधी " ची तरतुद करण्याबाबत**

**(४६) ७१२७७ (०९-०१-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अवैध वृक्षतोड आणि उपाययोजनामध्ये गुप्त सेवा निधीप्रमाणे पर्यावरण रक्षण, संवर्धन आणि वृक्ष जोपासना करणाऱ्या शेतकऱ्यांना "पर्यावरण निधी" ची तरतुद करण्याबाबत लोकप्रतिनिधीनी दिनांक २६ ऑगस्ट, २०१६ रोजी मा.मंत्री, वित्त आणि वने यांना लेखी पत्र देवून मागणी केली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, शासनाने गुप्त सेवा निधीप्रमाणे शेतकऱ्यांना पर्यावरण निधी उपलब्ध करून देण्याबाबत आतापर्यंत कोणती कार्यवाही केली आहे

(३) नसल्यास, याबाबत होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-०३-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) लोकप्रतिनिधींनी उपस्थित केलेला सदरहू मुद्दा धोरणात्मक स्वरुपाचा असल्याने याबाबत शासन स्तरावर विचार विनियम होत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहरातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिसरातील १९९५ पूर्वीच्या घरांना एक संधी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात

**(४७) ७२०२९ (०९-०१-२०१७). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिसरातील १९९५ पूर्वीच्या घरांना पर्यायी घरे देऊन ज्यांचे ७ हजार रुपये भरणा करावयाचे राहिले त्यांना एक संधी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात दिनांक १३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मंत्री (वने) यांना मा.पर्यावरण मंत्री यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या विनंतीवरुन शिफारस केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात मा.वनमंत्री यांनी अद्यापपर्यंत कोणताच निर्णय घेतला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) अद्यापपर्यत निर्णय घेतला असल्यास, त्यांचे स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-०३-२०१७) :**(१) होय हे खरे आहे.

(२) मुंबई शहरातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिसरातील १९९५ पूर्वीच्या घरांना पर्यायी घरे देण्याच्या अनुषंगाने रु.७००० भरण्याकरीता एक संधी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात मा.उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका व नोटीस ऑफ मोशन मा.उच्च न्यायालयाने फेटाळल्या आहेत. सदर आदेशाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेली विशेष विनंती याचिकाही फेटाळण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई उपनगरातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिसरात मोठ्या प्रमाणावर खड्डे पडल्याबाबत

**(४८) ७२२१९ (०९-०१-२०१७). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील निसर्गरम्य अशा संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिसरात मोठ्या प्रमाणावर खड्डे पडले असून मुख्य व अंतर्गत रस्त्यांवर खड्डे पडल्याने देश-विदेशातून येणाऱ्या पर्यटकांची गैरसोय होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उद्यानात असलेल्या आदिवासी पाड्यांनाही याच रस्त्यांचा वापर करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उद्यानाच्या अंतर्गत दुरुस्तीसाठी राज्य शासनाकडून वन विभागाला लाखो रुपयांचा निधी मिळूनही पडलेल्या खड्ड्यांकडे उद्यान प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचे पर्यटकांचे म्हणणे आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, तातडीने या राष्ट्रीय उद्यानातील रस्त्यांची डागडुजी करुन पर्यटकांना दिलासा देण्याबाबत शासन काय कार्यवाही करीत आहे वा करणार आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०२-२०१७)** :(१) सन २०१६ च्या पावसाळ्यामध्ये संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिसरातील रस्त्यांवर खड्डे पडल्याने काही ठिकाणी रस्त्यांचा पृष्ठभाग खडबडीत झाला होता हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निविदा मागविण्यात आल्या आहेत.

---

## साकोली, लाखनी व लाखांदूर (जि.भंडारा) तालुक्यात वन्यप्राण्यांनी शेतपिकाचे नुकसान केल्याबाबत

**(४९) ७२९६५ (०९-०१-२०१७). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा)** : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यातील साकोली, लाखनी व लाखांदूर या तिन्ही तालुक्यांना जंगल परिसराने घेरले असून या परिसरात शेती करणारा शेतकरी रानडुकरांसारख्या वन्य प्राण्यांमुळे हताश झाल्याचे प्राप्त झालेल्या निवेदनातून माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वन्यप्राणी शेतातील पिकांची मोठया प्रमाणात नुकसान करीत असून शेतकऱ्यांना संपुर्ण रात्रभर शेतशिवारात गस्त घालावी लागत त्यामुळे शासनाच्या वन्यजीव संरक्षण कायद्याची पायमल्ली होत असून वन्यप्राण्यांना कायद्याचे संरक्षण देताना शेतकऱ्यांच्या होत असलेल्या नुकसानीचा विचार करावा, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, वन्यप्राणी गावांत किंवा शेतशिवारात भटकू नये, यासाठी शासनाने काही उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३१-०१-२०१७)** :(१) व (२) हे खरे नाही.
भंडारा जिल्ह्यातील साकोली, लाखनी व लाखांदूर या तीन तालुक्यात वन्यप्राण्यांनी शेतपिकांचे नुकसान केल्याप्रकरणी प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यास नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

(३) वन्यप्राणी गावांमध्ये / मानवी वस्तीमध्ये शिरकाव करु नये म्हणून खालीलप्रमाणे प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येतात.

- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात मुबलक प्रमाणात पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यात येते.
- संवेदनशील भागात वनकर्मचाऱ्यामार्फत नियमित गस्त करण्यात येते.
- वन व शेतीच्या हद्दीवर वन्यप्राणी प्रतिबंधक चर खोदण्यात येतात.
- प्रायोगिक तत्वावर गावामध्ये सौर उर्जा चलीत बॅटरी रक्षक लावण्यात आले आहेत.

तसेच शेतीस नुकसान करणाऱ्या रोही व रानडुकरांची पारध करण्याची परवानगी देण्याचे अधिकार वन क्षेत्रपालांना देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती येथील वलगांव मार्गावरील टॉवरलाईन नजीकच्या नवदुर्गा सॉ मिलमध्ये १० ट्रक अवैध लाकूड आढळल्याबाबत

**(५०) ७३७६१ (०९-०१-२०१७). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील वलगांव मार्गावरील टॉवरलाईन नजीकच्या नवदुर्गा सॉ मिलमध्ये १० ट्रक अवैध लाकूड आढळले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरागिरण्याचे लाकूड रस्त्यावर नियमबाहयरित्या असून वनविभागामार्फत चौकशी करण्यात आली वा येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-०३-२०१७) :**(१) अमरावती वन विभागांतर्गत वार्ड-१, वलगाव रोड, अमरावती येथे स्थित नवदुर्गा सॉमिल या आरागिरणीची वनाधिकाऱ्यांनी दिनांक १८.९.२०१६ रोजी तपासणी केली असता, आरागिरणी परिसराचे आत विविध प्रजातीचा २१ नग, ४.५१७ घ.मी. इमारती माल आढळून आला. नंतर दिनांक २०.९२०१६ ते २२.९.२०१६ या दरम्यान केलेल्या पाहणीत आरागिरणी परिसराबाहेरही ६२४ नग (४०.९०१ घ.मी.) इतका इमारती माल आढळून आला.

(२) सदर इमारती लाकडासंदर्भात सक्षम प्राधिकरणाने जारी केलेला वाहतूक परवाना नसल्याचे निदर्शनास आले आहे. महाराष्ट्र वन नियमावली २०१४ चे नियम ३१ व ४७ तसेच परवान्यातील अटीचा भंग केल्यामुळे आरागिरणी परवानाधारक तसेच त्यांचा मुलगा यांचे विरुध्द दिनांक २६.१.२०१७ रोजी वनगुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. या व्यतिरिक्त परवानाधारकाने परवान्यातील अटी व शर्तीचा भंग केल्याने उपवनसंरक्षक, अमरावती यांनी आरागिरणी परवानाधारकास दिनांक ४.२.२०१७ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी आरागिरणी परिसरातील व लगतच्या परिसरात विनापरवाना वाहतुक केलेला इमारती माल आढळून आला आहे. त्याची शहानिशा करण्यात आली. परवानाधारक यांच्या मुलाने सदरचे लाकूड वृक्ष अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, उत्तर झोन-१, कृष्णा नगर, महानगरपालिका, अमरावती व त्यानुषंगाने उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, (निर्माण) क्रमांक १ अमरावती यांच्या परवानगीने स्थानिक रुग्णालय परिसरातून निष्कासित केला असल्याचे वनाधिकाऱ्यांना सांगितले आहे. त्याबाबत शहानिशा करुन वनगुन्हा नोंदविण्यात काही प्रमाणात विलंब झालेला आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.